Daily Lokmat News Paper
Kolhapur Edition.
31/07/2024

लोकमत

# आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांना उद्योजकता विकासाचे पंख

## डॉ. स्वाती पाटील : बोरपाडळे येथील उद्योजकता कक्षाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**वारणानगर** : आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास व नेतृत्व करून वाढीस लागण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन संजीवनी मल्टिपर्पज फाउंडेशन व भाजपच्या महिला प्रदेश सचिव डॉ. स्वाती दीपक पाटील यांनी केले.

बोरपाडळे (ता. पन्हाळा) येथील संजीवनी मल्टिपर्पज फाउंडेशन संचालित डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटरमध्ये एंटरप्रूनरशिप डेव्हलपमेंट सेल या उद्योजकता विकास कक्षाचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक पाटील व डॉ. स्वाती पाटील यांच्या हस्ते झाले.



**उद्योजकता विकास कक्षाचे उद्घाटन अध्यक्ष डॉ. दीपक पाटील व सचिव डॉ. स्वाती पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. स्मिता पाटील, सचिन पाटील, प्राचार्य नितीन ताटपुजे, डॉ. पराग कुलकर्णी उपस्थित होते.**

वैद्यकीय व्यवसाय आणि शिक्षकी पेशा याव्यतिरिक्त आयुर्वेदाशी संबंधित इतर उद्योग-व्यवसायांमध्ये सुद्धा विद्यार्थ्यांनी पुढे वाटचाल करावी, या उद्देशाने त्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन व साहाय्य देणे हा या सेलचा उद्देश असल्याचे डॉ. स्वाती पाटील यांनी सांगितले. डॉ. पराग कुलकर्णी लिखित एंटरप्रूनरशिप इन आयुर्वेद या पुस्तकाचे प्रकाशन केले. याप्रसंगी डॉ. स्मिता पाटील, सचिन पाटील, आनंदराव पाटील, डॉ. बाबासो पाटील, उत्तम नांगरे, प्राचार्य डॉ. नितीन ताटपुजे, डॉ. समीर जमादार, डॉ. केदार तोडकर, डॉ. शमीम जमादार, डॉ. सायली संकपाळ, डॉ. हर्षद साळुंखे उपस्थित होते.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

Dr. Deepak Patil Ayurvedic Medical College & Resrarch Center, Borpadale



बोरपाडळे : डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक कॉलेजमध्ये उद्योजकता विकास कक्षाचे उद्घाटन डॉ. दीपक पाटील, डॉ. स्वाती पाटील यांच्या हस्ते झाले.

# आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांना देणार उद्योजकता विकासाचे पंख

## डॉ. स्वाती पाटील

कोडोली : पुढारी वृत्तसेवा

आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास व नेतृत्व करून ते वाढीस लागण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन संजीवनी मल्टिपर्पज फाऊंडेशन व भाजपच्या महिला प्रदेश सचिव डॉ. स्वाती दीपक पाटील यांनी केले.

बोरपाडळे येथील संजीवनी मल्टिपर्पज फौंडेशन संचलित डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटरमध्ये इंटर्नलशिप डेव्हलपमेंट सेल या उद्योजकता विकास कक्षाचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक पाटील व डॉ. स्वाती पाटील यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी डॉ. पाटील बोलत होत्या.

नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टीम ऑफ मेडिसिन नवी दिल्ली (एनसीआयएसएम) आणि नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर मायक्रो स्मॉल अँड मीडियम एंटरप्राइजेस हैदराबाद (एनआय- एमएसएमइ) यांच्या संयुक्त विद्यमाने आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांसाठी विशेष प्रशिक्षण महाविद्यालयाचे अध्यापक डॉ.पराग कुलकर्णी यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर मार्गदर्शक तत्त्वानुसार सेलची स्थापना कॉलेजमध्ये करण्यात आली.

यावेळी डॉ. पराग कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. स्मिता पाटील, सचिन पाटील, आनंदराव पाटील, डॉ. बाबासो पाटील, उत्तम नांगरे, प्राचार्य डॉ. नितीन ताटपुजे, डॉ. समीर जमादार, डॉ. केदार तोडकर, डॉ. शमीम जमादार, डॉ. सायली संकपाळ, डॉ. हर्षद साळुंखे उपस्थित होते.